<u>**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, साकोली यांचे न्यायालय**</u>

(पिठासीन अधिकारी – **श्री. वि. म. गायकवाड**)

<u>**निशाणी क्र.०४ खाली आदेश**</u>

**(दिनांक ०८ जून, २०२६ रोजी पारीत)**

प्रस्तूतचा अर्ज अर्जदाराने **घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ (थोडक्यात, "म.सं.कौ.हिं. कायदा") च्या कलम २३** अंतर्गत दाखल करुन **कलम १८ नुसार संरक्षणाचा आदेश, कलम १९ नुसार निवासाचा आदेश, कलम २० नुसार आर्थीक सहाय्य व कलम २२ नुसार नुकसान भरपाईबाबतचा** आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे. गैरअर्जदारांनी त्यांचे उत्तर (निशाणी क्र.१०) प्रमाणे दाखल केले आहे.

२. अर्जदाराच्या अर्जाचे अवलोकन केले. गैरअर्जदारांनी दाखल केलेले म्हणणे व दोन्ही बाजूंचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर माझ्या निदर्शनास खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने विनंती केल्याप्रमाणे ती गैरअर्जदार क्र.१ कडून अंतरिम आर्थीक सहाय्य (पोटगी) मिळविण्यास पात्र आहेत काय ? जर हो, तर कोणत्या दराने ? | **अंशतः होकारार्थी. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा ५,०००/–रुपये मिळण्यास पात्र आहे.** |
| २. | कोणता आदेश ? | **अर्ज अंशतः मान्य करण्यात येतो.** |

<u>**कारणमिमांसा**</u>

३. <u>**मुद्दा क्रमांक १ व २ करीताः–**</u>

प्रथमतः हे नमुद करणे आवश्यक आहे की, अर्जदाराने तिचा मुळ अर्ज

**म.सं.कौ.हि. कायद्याच्या कलम १२** अंतर्गत विविध सवलतींसाठी दाखल केला आहे. सोबत तिने सदर अर्जान्वये कलम १८ नुसार संरक्षणाचा आदेश, कलम १९ नुसार निवासाचा आदेश, कलम २० नुसार आर्थीक सहाय्य व कलम २२ नुसार नुकसान भरपाई मिळण्याकरीता जरी नमुद केले असले तरी अर्जदाराचा मुळ उद्देश हा सदरचे प्रकरण प्रलंबीत असतांना गैरअर्जदारांकडून महिन्याकाठी ठरावीक पोटगी मिळण्याकरीता सादर केल्याचे त्यांच्या युक्तीवादावरुन दिसून येते. त्यामुळे, सदरचा अंतरीम अर्ज हा केवळ अर्जदाराला गैरअर्जदारांकडून १०,०००/– रुपये प्रती महिना आर्थीक सहाय्य मिळण्याच्या विनंतीकरीता विचारात घेण्यात आला. गैरअर्जदारांनी (निशाणी क्र.१०) प्रमाणे सविस्तर उत्तर सादर करुन अर्जदाराच्या आरोपाला व तिने मागितलेल्या विविध सवलतींना जोरदार आक्षेप घेतला.

४. अर्जदाराने तिच्या मुळ अर्जात व अंतरिम पोटगीच्या अर्जामध्ये तिच्यावर झालेल्या कौटूंबिक हिंसाचाराचे सविस्तर वर्णन केलेले आहे. त्यामध्ये तिने असे नमुद केले आहे की, तिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत रितीरीवाजाप्रमाणे मौजा–सुकळी येथे दिनांक १७/०४/२०१७ रोजी झाल्यानंतर ती गैरअर्जदारांच्या एकत्रीत कुटूंबात राहण्याकरीता तिच्या सासरी गेली. गैरअर्जदार क्र.१ च्या विवाहबंधनातून तिला दिनांक १६/०९/२०२० रोजी एक मुलगी जन्माला आली. मुलगी जन्मल्यानंतर काही दिवसांनी गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी तिला आईवडीलांकडून हुंडा आणण्याकरीता तगादा लावला. तेव्हापासून गैरअर्जदार हे अर्जदाराला त्रास देत होते. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारासोबत शारीरिक संबंध ठेवण्यास नकार देत होता व माझ्या मायबापाचा मान ठेवण्याकरीता केवळ तुझ्यासोबत लग्न केले असे म्हणत होता. पुढे, अर्जदाराचे असे म्हणने आहे की, गैरअर्जदार हे तिच्यासोबत बुवाबाजी करीत होते. गैरअर्जदार क्र.१ चे दुसऱ्या स्त्री सोबत अनैतिक संबंध होते. त्यामुळे गैरअर्जदार हे अर्जदाराला शारीरिक, मानसिक, लैंगीक त्रास देत होते. त्यामुळे, तिने सदरचा मुळ अर्ज व अंतरीम पोटगीचा अर्ज सादर करुन कायदेशीर दाद मागितली आहे.

५. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांचे असे म्हणने आहे की, गैरअर्जदारांनी

अर्जदाराला नेहमी चांगली वागणूक दिली. आई वडीलांकडून हुंड्याची मागणी केल्याची बाब गैरअर्जदारांनी नाकारली आहे. अर्जदाराचे वडील हे दारु पिण्याच्या सवयीचे असल्यामुळे अर्जदाराची आई ही त्यांना सोडून नागपूर येथे व सध्या मुंबई येथे वास्तव्यास आहे. अर्जदाराची मोठी बहिण ही मौजा–सावरबंध येथील दत्तप्रसाद बडवाईक यांच्यासोबत पळून जावून लग्न केलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ ते ३ हे आपला पारंपारीक व्यवसाय सोडून गैरअर्जदार क्र.१ हा हातगाडा घेवून गावोगावी मनेरी विकण्याचे काम करायचा तर गैरअर्जदार क्र.३ हा नागपूर येथे ड्रायव्हरचे काम करायचा. गैरअर्जदार क्र.१ चे असे म्हणने आहे की, अर्जदाराला तिऱ्हाईत व्यक्तीसोबत संबंध ठेवण्याकरीता अडथळा केल्यामुळे तिने रागाच्या भरात प्रस्तूतचे प्रकरण गैरअर्जदारांना अडकविण्याकरीता दाखल केले आहे. म्हणून, सदरचे प्रकरण खारीज करण्याची विनंती गैरअर्जदारांनी केली आहे.

**६.** अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ हे पती–पत्नी असल्याची बाब दोघांना मान्य व कबुल आहे. तसेच, सदर लग्नसंबंधातून त्यांना एक मुलगी जन्मलाची बाब दोन्ही पक्षकारांना मान्य व कबुल आहे. पुढे, लग्न झाल्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ सोबत त्यांच्या कुटूंबीयांमध्ये मौजा–सुकळी येथे राहत होती ही बाब सुध्दा गैरअर्जदारांना मान्य व कबुल आहे. परंतू, त्यांनी अर्जदाराने लावलेले कौटूंबीक हिंसाचाराचे आरोप नाकारले आहे. असे असले तरी सुध्दा गैरअर्जदारांनी अर्जदाराचे तिऱ्हाईत व्यक्तीसोबत संबंध असल्याचा आरोप केला असून सदर संबंधामध्ये अडथळा निर्माण झाल्यामुळे गैरअर्जदारांविरुध्द सदरचे प्रकरण दाखल करण्यात आल्याचे नमुद केले आहे. परंतू, सदर बाब प्रथमदर्शनी दाखविण्याकरीता त्यांनी कोणत्याही प्रकारचा पुरावा दिलेला नाही. याउलट अर्जदाराने दस्तयादी निशाणी क्र.१५ प्रमाणे गैरअर्जदार क्र.१ ने दिनांक २२/०१/२०२५ रोजी एक पर स्त्री सोबत आर्य समाज, संजय नगर रायपूर, जि. रायपूर, छत्तीसगढ येथे दुसरा विवाह केल्याचे व त्या विवाहसंबंधातून सदर स्त्री ला एक मुल जन्मल्यासंदर्भातील प्राथमीक स्वास्थ केंद्र येथील पावती सादर केली आहे. पुढे अर्जदाराने तिचे गैरअर्जदार क्र.१ सोबत पती–पत्नीचे नाते अस्तीत्वात

असतांना गैरअर्जदार क्र.१ ने दुसरा विवाह केल्यासंदर्भातील काही छायाचित्र अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदाराने सादर केलेला विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मुल जन्मल्याबाबत प्राथमीक स्वास्थ केंद्राची पावती व छायाचित्रांवरुन गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारासोबतचे लग्नसंबंध अस्तीत्वात असतांना दुसरे लग्न केल्याचे म्हणता येईल. अर्जदारावर गैरअर्जदारांकडून तिचे तिऱ्हाईत व्यक्तीसोबत असलेल्या अनैतिक संबंधाचा आरोप व तिचे गैरअर्जदार क्र.१ सोबतचे लग्नसंबंध अस्तीत्वात असतांना गैरअर्जदार क्र.१ ने केलेले दुसरे लग्न या बाबींवरुन अर्जदारांविरुध्द कौटूंबिक हिंसाचार झाला असे म्हणता येईल.

७. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ पासून वेगळी राहत असल्याची बाब गैरअर्जदाराला कबुल आहे. अर्जदार हिने गैरअर्जदारासोबतचे कौटूंबिक नातेसंबंध स्वतःहून सोडून तिच्या नातेवाईकांकडे गेली किंवा गैरअर्जदारांच्या कौटूंबिक हिंसाचाराच्या कृत्यामुळे अर्जदाराला तिचे लग्नाचे घर सोडून इतर लोकांच्या घरी राहणे भाग पडले हा पुराव्याचा विषय असून ते प्रकरण चालवितांना ठरविणे योग्य व न्यायाचे होईल. तसेच, गैरअर्जदारांनी सुध्दा अर्जदाराविरुध्द केलेले आरोप देखील चौकशीचा विषय आहे. परंतू, दोन्ही पक्षकारांच्या प्रकरणातून व युक्तीवादावरुन तसेच अभिलेखावरील दाखल दस्तऐवजांवरुन प्राथमिकदृष्ट्या असे दिसून येते की, अर्जदाराकडे गैरअर्जदारांकडून कौटूंबिक हिंसाचार झाला असून ती अंतरीम पोटगी मिळण्याकरीता पात्र आहे.

८. महिलांना अंतरिम पोटगी देण्यामागे कायद्याचा उद्देश तिचे उपजिवीकेचे एक साधन म्हणून पुरविण्याकरीता तसेच प्रस्तूतची कार्यवाही लढण्यास सक्षम करणे आहे. जरी सद्यस्थितीत, दोन्ही पक्षांचे पुरावे अद्याप नोंदवले गेले नसले तरी, गैरअर्जदार क्र.१ कडे पुरेसे उत्पन्नाचे स्त्रोत असल्याचा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा नाही. परंतु, गैरअर्जदारांनी सादर केलेल्या (निशाणी क्र.१३) वरील मालमत्ता व दायीत्व प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता गैरअर्जदार क्र.१ ने तो मनेरी विक्रीचा व्यवसाय करत असल्याचे कबुल केले आहे. तसेच, गैरअर्जदारांच्या विधिज्ञांनी सुध्दा

आपल्या युक्तीवादादरम्यान सदर बाबीची कबुली दिलेली आहे. गैरअर्जदार क्र.१ ने त्याला एक मुलगी असून तिची जबाबदारी त्याच्यावर असल्याचे मालमत्ता व दायीत्व प्रमाणपत्रात म्हटले आहे. परंतू, त्या अनुषंगाने त्याने अर्जदाराची व मुलीची वेगळी सोय केली किंवा कसे हे दर्शविणारा कोणताही प्राथमीक पुरावा अभिलेखावर दिला नाही. त्यामुळे, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराला पोटगी देण्यास तो मनेरीचा व्यवसाय करीत असल्यामुळे सक्षम असल्याचा अनुमान काढणे न्यायोचित होईल. म्हणून, गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार यांना ५,०००/–रुपये प्रतिमहिना आर्थीक सहाय्य (पोटगी) म्हणून देतील असा तात्पुरता आदेश देणे न्यायोचित होईल. म्हणून, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात पुढील आदेश देत आहे:–

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराला रुपये ५,०००/– (पाच हजार रुपये फक्त) प्रतिमहिना अंतरिम आर्थिक सहाय्य (पोटगी) म्हणून मुळ अर्ज दाखल दिनांकापासून द्यावी.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

४. प्रस्तूत आदेशाची प्रत दोन्ही पक्षाला विनामुल्य देण्यात यावी.

अर्जदार व गैरअर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी आपला पुरावा लवकरात लवकर नोंदवून प्रकरण निकाली काढण्याकरीता न्यायालयाला सहकार्य करावे.

VISHAL MAHANAND GAIKWAD

Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2026.06.08 17:09:41 +0530

साकोली
दिनांकः ०८/०६/२०२६

**(वि. म. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
साकोली